# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक १०/०२/२०२३ (शुक्रवार)

---

## अपघातात मृत्यु

पोलीस स्टेशन खापा :- अंतर्गत मौजा सिंदेवानी शिवार २८ कि मी उत्तर. येथे दिनांक ०९/०२/२३ चे १४/०० वा ते १४/५५ वा दरम्यान, यातील अनोळखी वाहन पांढऱ्या रंगाचे बोलेरो पिकअप चे चालकाने आपले ताब्यातील वाहन विरूध्द दिशेने भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून समोरून येणाऱ्या बुलेट मो सा क्र एमएच- ४० सीएल-४७४१ चे चालकास धडक देवून बुलेट वरील स्वार क्र १) शुभम भिमराव मैंद वय २७ वर्ष व मागे बसलेले २)प्रमोद भिमराव मैंद वय २९ वर्ष रा पाटनसावंगी हे गंभीर जखमी असुन ३)**मुल्लीधर नारायण डेहेनकर वय ५५ वर्ष रा पाठणसावंगी** हे अपघातात मरण पावले. सदर बालेरो पिकअप वाहन हे घटनास्थळावरून पळून गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- दिलीप वामनरावजी चौधरी वय ४३ वर्ष रा वार्ड नं ४ पाटनसावंगी ता सावनेर जि नागपूर मो नं ८८०५६८९५४३ यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे बोलेरो पिकअप वाहन चालकाविरूध्द कलम ३७९, ३३७,३०४ (अ) भादवी सह कलम १८४, १३४/१७७ मोवाका अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास - सपोनि मनोज खडसे ठाणेदार खापा मो नं ९४२१०५०३७० हे करीत आहे.

## जबरी संभोग

पोलीस स्टेशन बोरी :- अंतर्गत मौजा बुटीबोरी येथील नवीन बस स्टॉपचे जवळील जंगल परीसर १ कीमी पश्चिम. येथे फिर्यादी पिडीत मुलगी वय १४ वर्ष ही दि. ०४/०२/२३ रोजी ७/३० वा. चे दरम्यान घरून शाळेत आली व शाळा सुटल्याने शाळेतून घरी जाण्यासाठी निघाली असता ती जुनी वस्ती व उमरेड कडे जाणारे चौकात उभी राहून देवळी गुजर कडे जाणारे रोड वर जाणारे वाहनाची वाट पाहत असताना तिचा ओळखीचा तुषार कुळमेथे रा. जुनीवस्ती हा आपली मोटार सायकल घेवून तिथे आला व तिला मी देवळी गुजरकडे जात आहे, चल तुला देवळी गुजर येथे सोडतो, असे म्हणून पिडीतेला त्याचे गाडी वर बसवून तिला बुटीबोरी चे नवीन बनत असलेल्या बस स्टॉपचे जवळील जंगलात नेवून तिचे हाताला पकडून तिचे गालावर मारून तिचे सोबत जबरदस्तीने शारीरीक संबंध केले. व तु कोणाला काही सांगितले तर तुला मारून टाकिन अशी धमकी देवून तेथून निघून गेला

सदर प्रकरणी फिर्यादी पिडीतीचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी नामे- तुशार रमेश कुळमेथे वय २५ वर्षे रा. जुनी वस्ती वार्ड नं. १ बुटीबोरी जि. नागपूर यांचे विरूध्द कलम ३७६(३),३२३,५०६ भा.द.वि. सह कलम ४,पोक्सो अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयातील आरोपीस अटक करण्यात आली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास - मपोउपनी रेजिवाड पो.स्टे. बुटीबोरी ९८३४८२५७९३ हे करीत आहे.